क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३ दिनांक २५/०७/२००६

विषय : महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाच्या सन १९९८ - ९९ च्या अहवालावरील शिफारशीबाबत.

संदर्भ : कक्ष अधिकारी ,उद्योग, ऊर्जा, व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण २००६/आर ६४७ / ऊर्जा - २ दि. २३ मे २००६

--------

कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय दिनांक २३/५/२००६ च्या पत्रासोबत प्राप्त झालेले सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००२/१९५२/ प्र. क्र. ६५ / २००२/१६- ब दिनांक २१/४/२००६ या सोबत जोडले आहे.

२. सर्व संबंधीतांना विनंती करण्यात येते की शासनाच्या सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे अवलोकन करावे आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

३. उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे .

सोबत : वरीलप्रमाणे.

*(सु. य. पाटिल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
म.रा.वी. वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

F.N.5

महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या अहवालावरील शिफारशीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
**शासन परिपत्रक क्रमांक :बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६-ब,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
दिनांक : २१/४/२००६

संदर्भ :(१) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७५/३४८/(ओ)११/सोळा, दिनांक १६ नोव्हेंबर,१९७६.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७७/१५२२/सोळा, दिनांक २१ ऑक्टोबर,१९७७.
(३) शासन परिपत्रक क्रमांक :बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६-ब, दिनांक : १/१०/२००३

शासन परिपत्रक

श्री.लाड व पागे समितीने मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शिफारशी केलेल्या आहेत त्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग व नगर विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आदेशांचे/सूचनांचे अंमलबजावणी करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक (३) येथील परिपत्रकान्वये निदेश निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु या निदेशांचे शासकीय / निमशासकीय/ महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपरिषदा / मंडळे / महामंडळे / स्वायत्तसंस्था/ अनुदानित संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी या निदेशांची/सूचनांची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब त्या अनुषंगाने सर्व शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका /नगरपालिका / नगरपरिषदा / मंडळे / महामंडळे / स्वायत्तसंस्था / अनुदानित संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांनी दिनांक: १/१०/२००३ या शासन परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या निदेशांची सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

२. सफाई कामगारांच्या विविध मागण्या/प्रश्नाबाबत तसेच लाड व पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या समन्वयाचे कामकाज हे सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभागाकडून पाहिले जाते. तसेच याबाबत त्या विभागाकडुन वेळोवेळी बैठकांचे आयोजन केले जाते. तेव्हा सफाई कामगारांच्या विविध मागण्या/प्रश्नाबाबत तसेच समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीसंदर्भात काही मार्गदर्शन आवश्यक असल्यास याबाबतचा पुढील सर्व पत्रव्यवहार सामाजिक न्याय विभागाकडे करावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, वर उल्लेखिलेले आदेश त्यांच्या अधिपत्याखालील/प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना, कार्यालय प्रमुखांना, मंडळे/महामंडळे/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका /स्वायत्त संस्था/ अनुदानित संस्था इत्यादींच्या निदर्शनास आणण्यात यावेत.



४. सदरचे परिपत्रक सामाजिक न्याय विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१५८३ दिनांक १८/१/२००६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(त्रि.वा.गेडाम)